सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१६–१७/१२९३ दिनांक : १७/०५/२०१७

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक/ मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग

**विषय :– ''दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस'' रविवार दि. २१ मे ऐवजी दि. २०मे २०१७ रोजी साजरा करण्याबाबत.**
**संदर्भ क्र. :– १) शासन परिपत्रक क्र. जपूति–२२१७/प्र.क्र.९७/२९, दि. १६ मे, २०१७**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सन २०१७ मध्ये राष्ट्र पुरुष/थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम शासन परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आले आहेत. सदर परिपत्रकानुसार ''दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस'' शनिवार, दि. २० मे, २०१७ रोजी दहशतवाद व हिंसाचारविरोधी प्रतिज्ञा घेऊन साजरा करण्यात यावा. सदर प्रतिज्ञा सोबत जोडली आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेमध्ये/सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदव्युत्तर विभागात महाराष्ट्र शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करावे. कळावे, ही विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

कार्यालय : ०२०–२५६०११५४, ०२०–२५६०११६०, फॅक्स : ०२०–२५६०११५४, मो.: ९८८१९०८०२०
**Website :** http://www.unipune.ac.in/bsw **Email :** bsw@unipune.ac.in, bsw@pun.unipune.ac.in

“दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस ” रविवार
दिनांक २१ मे, २०१७ ऐवजी शनिवार, दिनांक २० मे,
२०१७ रोजी साजरा करण्याबाबत. . . . .

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक, क्रमांक जपूति-२२१७/प्र.क्र. ९७/२९**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक १६ मे, २०१७

वाचाः-१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. जपूति-२२१६/प्र.क्र.१३६/२९, दिनांक २७.१२.२०१६
२) गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे परिपत्रक क्र. १९/१०/२०१७-पब्लीक, दिनांक ४.०५.२०१७

परिपत्रक :-

सन २०१७ मध्ये राष्ट्र पुरुष/ थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम संदर्भाधीन दिनांक २७.१२.२०१६ च्या परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आले आहेत. सदर परिपत्रकानुसार “दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस ” रविवार, दिनांक २१ मे, २०१७ रोजी दहशतवाद व हिंसाचारविरोधी प्रतिज्ञा घेऊन साजरा करण्यात येतो.

२. तथापि, केंद्र शासनाच्या कार्यालयांना दिनांक २० मे, २०१७ व दिनांक २१ मे, २०१७ रोजी अनुक्रमे शनिवार व रविवार च्या सुट्ट्या असल्याने केंद्र शासनाने संदर्भाधीन दिनांक ४ मे, २०१७ च्या परिपत्रकान्वये सदरचा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक १९ मे, २०१७ रोजी साजरा करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

३. रविवार, दिनांक २१ मे, २०१७ रोजी राज्यातील शासकीय / निमशासकीय कार्यालयांना सुट्टी असल्याने “दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस ” रविवार, दिनांक २१ मे, २०१७ ऐवजी शनिवार, दिनांक २० मे, २०१७ रोजी दहशतवाद व हिंसाचारविरोधी प्रतिज्ञा घेऊन साजरा करण्यात यावा. प्रतिज्ञेचे प्रारुप सोबत जोडले आहे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०५१६१६४६४५५००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सं. कृ. भोसले )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव /स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४. मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ,
७. सर्व मंत्रालयीन विभाग,
८. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दी देण्यासाठी )
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१३. आयुक्त, सर्व महानगरपालिका,
१४. निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली,
१५. निवडनस्ती ( कार्यासन-२९ )

# दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिवसाच्या निमित्ताने घ्यावयाची प्रतिज्ञा

आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपुर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवजातीमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करू, तसेच मानवी जिवीत आणि मूल्य धोक्यात आणणा-या विघटनकारी शक्तींचा प्रतिकार करू.

*****